RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

● Mailing Address ●
Dr. Sadashiv H. Sarkate
Editor : POWER OF KNOWLEDGE
**Associate Professor &Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 2000/-



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | भळभळत्या जखमांचा हुदुंका- लतिका चौधरी यांची कादंबरी | प्रा. डॉ. शिशकांत पाटील | 88 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय कृषिविषयक विचार व कार्य | प्रा. डॉ. बोकारे तुकाराम एकनाथराव | 92 |
| 23 | विज्ञापन और हिंदी भाषा | प्रा. पठाण जयनुल्लाखान | 95 |
| 24 | उषा प्रियंवदा के उपन्यासों में सामाजिक चेतना | प्रा. डॉ. उत्तम जाधव | 98 |
| 25 | स्त्रियांच्या उध्दारासाठी महापुरुषांचे योगदान | प्रा. मोहन सौंदय | 101 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली लोकशाही | डॉ. प्रल्हाद होंडे | 103 |
| 27 | ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरुप | प्रा. डॉ. लक्ष्मण गिते | 106 |
| 28 | संत साहित्यातील सामाजिक समतेचा वैश्विक उद्घोष | प्रा. डॉ. सदाशिव सरकटे | 109 |
| 29 | दलित कविता आणि विद्रोह | प्रा. डॉ. लक्ष्मण गिते | 112 |
| 30 | हिंदी उपन्यासों में चित्रित नारी का मनोवैज्ञानिक विश्लेषण | गायकवाड संजय सिताराम | 114 |
| 31 | "आपत्ती व्यवस्थापन : आधुनिक काळाची गरज" | बनकर अश्विनी भास्करराव | 117 |
| 32 | महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या कमी पटाच्या शाळांच्या स्थलांतरणाचा विद्यार्थ्यां वरील परिणामाचा चिकित्सक अभ्यचास | श्री. पवार संदीप रावसाहेब | 122 |
| 33 | लोकसंस्कृती आणि लोकदैवते | प्रा. विजय पांडूरंग शिंदे<br>डॉ. राजशेखर नळगे | 127 |
| 34 | पंढरीची वारी : उद्गम आणि विकास | प्रा. डॉ. गोपाल ढोले | 133 |
| 35 | एकविसाव्या शतकातील दलित संघर्ष | प्रा.सिद्धार्थ मुंगे | 139 |


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.





**Digital**
**reduce**

**Digital tran**
Digi
have togethe
Financial tec
demanding n
convenience
licensees pro
Digi
paper and, th
reduce transa
can be orien
Internet com
day outdo mo
Banl
tal transform
imagining th
doing away v
a cherub boc
levels, and hi
The second i:
cannibalize t
Irres
technology is
quite abunda
and not year
security. Ban
The
other socio-e
should be ha
**What requi**
Ever
phones via S
cards and int
co-operative
Aadhar card
'digital villag

# लोकसंस्कृती आणि लोकदैवते

संशोक
प्रा. विजय पांडूरंग शिंदे

मार्गदर्शक
डॉ. राजशेखर नळगे

## प्रास्ताविक :

भारत देश हा संस्कृती प्रिय असून भारतामध्ये प्राचीन व प्रगल्भ असणाऱ्या संस्कृतीचे अंतरंग एकात्म, एकरूप झालेले आहे. हजारो वर्षापासून सर्व जाती धर्माचे लोक येथे गुण्यागोविंदाने एकत्र नांदताना दिसतात. मानव हा समूहशील व समाजशील प्राणी असून तो बुध्दीमान आहे. मात्र तो संस्कृतीच्या आणि सभ्यतेच्या आधाराने जगत असतो. माणसांच्या जीवनशैलीशी एक समूहमन सदैव निगडीत असते. मानवाच्या संस्कृतीवर नितीमत्तेच्या कल्पनांचा, कलेच्या आविष्काराचा, वाङमयाचा प्रभाव असल्याने लोकसंस्कृतीत तो रममाण होतो. पण आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानामुळे मानवाने भौतिक प्रगती अफाट केली आहे. या विकासाच्या मागे धावताना तो हजारो वर्षांची जी लोकसंस्कृती त्याच्या सुखसमाधानासाठी अत्यंत महत्वाची आहे तीच आज तो विसरत चालला आहे का? की भारतीय सांस्कृतिक ठेव्यापासून तो दूर तर जात नाही ना? सध्याच्या समाजजीवनातील जीवघेण्या स्पर्धा अनैतिकता, वाढती गुन्हेगारी, व्यसनाधीनता, अराजकता अशा अनेक गोष्टींमुळे तो मानवीमूल्ये पायदळी तुडवीत माणूसकी, प्रेम हरवत चालला आहे का? अशा प्रश्नांची उत्तरे जर होकारार्थी असतील तर आजच्या संपूर्ण मानवी जीवनाला आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक मूल्यांची गरज आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी आपणाला आपल्या लोकसंस्कृतीकडे वळावे लागेल. भारतीय लोकांविषयी सांस्कृतिक संदर्भाने विचार मांडताना भालचंद्र नेमाडे म्हणतात की, "आपण जितके मागे जातो तितके आपण पुढे जातो" म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधामध्ये आपली लोकसंस्कृती व लोकदेवत कथा यांचे सामाजिक स्वरूप अभ्यासून त्याच्या योगदानावर भाष्य करावयाचे आहे.

## शोधनिबंधाचा उददेश :

१) लोकसंस्कृती आणि लोकदैवते यांचा परस्पर संबंध स्पष्ट करणे.
२) लोकसंस्कृती आणि देवता संकल्पना समजून घेणे.
३) लोकदैवते आणि लोकसंस्कृतीचा आविष्कार कसा होतो हे पाहणे.
४) लोकदैवतांतून होणारे सांस्कृतिक दर्शन अभ्यासणे.
५) लोकदैवतांमुळेच कला आणि वाङमय निर्माण होते हे पाहणे.
६) माणदेशातील लोकसंस्कृती आणि लोकदैवतांचे विश्लेषण करणे.

या उददेशाने प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषण करण्यात आले आहे.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

## लोक, संस्कृती आणि देवता :-

लोक हा शब्दच संस्कृतमधील लोकदर्शने या धातूपासून तयार झाला. याचा अर्थ पाहणे असा होतो. त्र ... जन या अर्थाने तो येतो तर इनसायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका या कोशात अप्रगत, असंस्कृत, अविकसित ...कसमूह म्हणजे लोक अशी व्याख्याच केलेली दिसते. तर जे खेडयात किंवा शहरात राहतात, ज्यांना स्वतःच्या ...स्कृतिक परंपरेचे व वैशिष्टयांचे भान असते, जे परंपरेने चालत आलेले जीवन जगतात ही परंपरा मौखिक ...पात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येते. त्यांचे जीवन नैसर्गिक, सहज आणि स्वाभाविक असते अशी ... विश्वनाथ शिंदे यांनी व्याख्या केली आहे.

'देवता' या शब्दाचा भावार्थ असा की, जिच्याठायी दिव्यतेज अथवा सामर्थ्य असते ती देवता होय. जी ... अशी शक्ती अदृश्य रूपाने सर्वत्र संचार करते, भक्ताची श्रध्दा, भक्ती उत्कट झाल्यास जी दृश्यरूपानेही ...भिव्यक्त होते. ती पूजा व बळी यांचे ग्रहण करून भक्तांच्या किंवा उपासकांच्या मनोकामना पूर्ण करते. जी ...क्तांच्या मार्गातील अडथळे दूर करून त्यांचे जीवन निर्भय व निराबंध करते वा देवता असे स्पष्टीकरण भारतीय ...स्कृती कोश खंड चौथा मध्ये दिले आहे.

संस्कृतीची व्याख्या करताना रायल यांनी "ज्ञान, विश्वास, कला, आजार विधी, रीती आणि जिच्यात ...नेक गोष्टी सामावून घेण्याची क्षमता असते ती संस्कृती होय".

भारतीय संस्कृतीतील विविधता पाहता त्यामध्ये एकता ही दिसून येते. आणि लोकसंस्कृतीतील भिन्न ...कदेवते त्यांचा समाजमनावरील परिणाम त्यातून प्रकट होणारे सांस्कृतिक जीवन आपल्या लक्षात येते.

## लोकदैवते आणि लोकसंस्कृतीचा आविष्कार :-

भारतीय लोकमानस श्रध्दाप्रिय असल्याने लोकदैवते ही त्यांची अपार श्रध्दास्थाने आहेत. विज्ञान तंत्रज्ञ ...च्या अफाट प्रगतीमुळे मानवाचे भौतिक जीवन आमुलाग्र बदलले असले तरी लोकदैवतांविषयीची श्रध्दा आणि ... कालही होती आणि आजही आहे. या श्रध्देपोटीच लोकविधी, धर्मविधी, रूढी, परंपरा, संस्कारविधी, सामाजिक ... यातून समूहमनाचा आविष्कार होवून लोकजीवनाचे अविभाज्य भाग बनले. "आज प्रचलित असलेल्या रूढी ... लोकविश्वास कित्येक शतकांपूर्वी व्यक्ति मनातून लोकमानसात स्थित झाले आणि परंपरेने ते आजपर्यंत ...मानसाने जतन करून ठेवले "? समूहमनाचे विविध पैलू येथे लक्षात घेण्यासारखे आहेत.

लोकदैवते ही केवळ हिंदूधर्मापुरतीच मर्यादित नाहीत तर संपूर्ण जगात ते सत्ता गाजविताना दिसतात. उदा. ... संस्कृतीत 'मानीज', 'लार' या कुलरक्षक देवता, द्राक्षांच्या शेतीचे रक्षण करणारी 'व्हीनस' देवता,



Principal
Jawahar Arts, Science & Commerce Colleges
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

. धान्य पिकाची रक्षण करणारी 'सेरेसित' देवता यांची उपासना व उत्सव रोम संस्कृतीत करतात कारण जन्मापासून मृत्युपर्यंत या लोकदेवता सामान्यांचे रक्षण करतात अशी मानवाची श्रध्दा आहे.

आज खेडयापाडयाचे चित्र बदलत आहे. शेकडो वर्षे कृषी जीवनात पिढयानपिढया कष्ट करत असलेल्या मानवाचे दुःख वेदना, व्यथा यांना कोण वाली आहे का? आधुनिकतेच्या नावाखाली माणुसकी विसरत चाललेला समाज जर पुन्हा लोकसंस्कृतीकडे डोळस नजरेने जेव्हा पाहू लागेल तेव्हा निश्चितच त्याला त्यातून आत्मविश्वास मिळेल. ही शक्यता नाकारता येणार नाही असे वाटते.

## लोकदैवतांतून होणारे सांस्कृतिक दर्शन :-

लोकसमूहाच्या मनात लोकदैवतांविषयी प्रचंड श्रध्दाभाव असल्याने त्यांच्या वर्तनातून याचे प्रत्यंतर दिसून येते. सदवर्तनाकडे लोकांचा कल या सांस्कृतिकतेतून आपोआपच वळलेला दिसतो.

भिन्न गावाच्या देवता भिन्न, त्या ठिकाणाचे मानकरी भिन्न यातून विविधता जरी आढळली तरी त्याचा उद्देश एकच असतो, तो म्हणजे मानवी जीवनाला स्थैर्य आणि आनंद प्राप्त करणे.

यात्रा, जत्रेनिमित्त नोकरीला परगावी असलेला माणूस आपल्या मूळगावी येतो. संकोच न बाळगता तो परंपरा जोपासताना दिसतो. भक्तीभावाने सणउत्सवाप्रसंगी लोक एकत्र येवून आपुलकी आणि जिव्हाळयाने एकमेकांची विचारपूस करतात.

लोकदैवतांविषयी असणाऱ्या श्रध्दा परंपरागत असून त्या आजही टिकून आहे. त्याचेच प्रतिबिंब सांस्कृतिक जीवनात उमटलेले दिसते. लोकदैवतांवरील श्रध्दा माणसाचे मनोबल तर उंचावतोच पण समूहाची एकात्मताही वाढवते हे अत्यंत महत्वाचे आहे.

भारतासारख्या निसर्गसंपन्न व अगणित खेडयांमध्ये कित्येक वस्तूंना लोकदैवतांचे स्थान दिलेले असून त्याचे प्रतिकात्मक मूर्तीकरण केले जाते. तर कधी त्यांना मानवीरूपही दिले जाते. माणसांचे दैवतीकरण आणि दैवतांना मनुष्यरूप देणे हे मानवांमधील सहज प्रवृत्ती आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे.

लोकदैवते ही लोकमानसाला भयमुक्त करतात. संरक्षण देताना दिसतात. त्यांचे अशा आकाक्षांचे मानसिक समाधान करण्यात लोकदैवते महत्वाची भूमिका बजावतात.

लोकसंस्कृतीच्या आचरणाचा उद्देश हा वैचारिकतेपेक्षा भावनिक जास्त असल्याचे दिसते. त्यामुळे लोकदेवतांच्या उपासनेत श्रध्दा, प्रेम, आदर, वात्सल्य, परोपकार ही संस्कृतीची मूल्ये मानव जोपासतो/जोपासली जातात तोच आपला वसा आणि वारसा पुढील पिढीकडे संक्रमित होत जातो.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

### लोकदैवते : कला आणि वाङमय -

लोकसंस्कृतीमध्ये लोकदैवत निर्माण झाल्यानंतर त्यांच्या पूजाअर्चा, विधी परंपरा यातून अनेकविध लोक ... निर्माण झाले. त्याच्याही पुढे परंपरा तयार होत गेल्या. या उपासकांच्या मार्फत लोकसंस्कृतीमध्ये विविध ... उदयास आल्या. या कलांच्या जोपासणेतून त्या त्या लोकदैवतांविषयीचे गुणगाण करण्यासाठी महत्व पटवून ... समाजातून अनेक प्रकारचे लोकवाङमय निर्माण झाले. लोकसंस्कृतीचे संवर्धन महाराष्ट्रामध्ये ... अनेक उपासकांनी अत्यंत प्रभावीपणे व श्रध्दापूर्वक केलेले दिसून येते. त्यामध्ये वाघ्यामुरळी, ... पोतराज, दंडारी, दशावतारी, पांगुळ, वासुदेव यांनी लोकधर्माबरोबरच लोकजागर करण्याचेही ... केले आहे. नृत्य, नाटय, गायन, अभिनय व रसाविष्कार यातून रंजन तर केलेच पण एक सांस्कृतिक ... पिढयांकडे देण्याचे महत्वाचे कार्य झाले हे नाकारून चालणार नाही. कला आणि वाङमयाची गंगोत्री ... लोकदैवतांकडे पाहावे लागेल.

लोकसंस्कृती हा लोकसाहित्याचा प्राणभूत, पायाभूत घटक आहे. ही संस्कृती निसर्गसंन्मुख असल्याने ... पूजा लोकसंस्कृतीत होते. लोकसंस्कृतीमध्ये दोन प्रकारच्या दैवतांचे प्राबल्य जास्त जाणवते. ते ... पितृदेवता आणि मातृदेवता. उदा. पितृदेवतांमध्ये खंडोबा, जोतीबा, बिरोबा, भैरोबा तर मातृदेवतांमध्ये ... आई, जानाई, येडाई, यमाई, भवानीमाता अशा दैवतांचा समावेश होतो. प्रदेश परत्वे दोन्ही प्रकारच्या ... नावात बदल झालेला दिसून येतो. या दोन्ही प्रकारच्या लोकदैवतांविषयीचे विपुल प्रमाणात वाङमय ... झाले. तेच वाङमय आजच्या वर्तमान काळातील साहित्याला पोषकच आहे. या वाङमयातून लोकसंस्कृतीचा ... मूल्यांची शिदोरी आजच्या समाजमानसाला नित्योपयोगीच आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

### माणदेशातील लोकसंस्कृती आणि लोकदैवते :

पश्चिम महाराष्ट्रातील माणदेश हा प्रदेश कायम दुष्काळी असला तरी येथे लोकदैवतांची महत्वाची ... आहेत. या लोकदैवतांच्या यात्रा, उत्सव, रूढीपरंपरा यातून माणदेशी लोकसंस्कृती उदयास आलेली ... दिसते. माणदेशात गवळी धनगर पशुपालक या समाजाची मोठी लोकवस्ती असून त्याआधारे जातीरचना ... माणदेशात शिखर शिंगणापूरचा शंभूमहादेव, करगणीचा लखमेश्वर, म्हसवडचा सिध्दनाथ, आरेवाडीचा ... मोठी लोकदैवते आहेत. त्याचा जनमानसावर मोठा प्रभाव आढळतो.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

माणदेशातील लोकदैवते वैष्णव परंपरेपेक्षा शैव परंपरेशी जास्त संबंधित असल्याचे दिसते. उत्पतीकथांच्या वेगवेगळया आख्यायिका आहेत. माणदेशी समाज आणि लोकसंस्कृतीत विलक्षण एकजीनसीपणा आहे. माणदेशातील लोकगीते, लोककथा म्हणी, लोकोक्ती, लोकनृत्य, लोककला, धार्मिक विधी, व्रतवैकल्ये, कुलाचार, कुलधर्म, रूढीपरंपरा, आचारविचार ग्रामदैवते व त्यांचे पूजाविधी समाजधारणा समजून घेण्यासाठी लोकसंस्कृती महत्वाची वाटते. माणदेशातील लोकसंस्कृतीला एक संपन्न असा प्राचीन वारसा असल्याचे दिसते. इतरत्र न आढळणारा लोकसंस्कृतीचा घटक म्हणजे माणदेशी गजीनृत्य. हे एक वेगळेपण आहे. माणप्रदेशावर निसर्गाची अवकृपा झाली असली तरी येथील लोक संस्कृतीमध्ये माणुसकीचे झरे अखंड वाहताना दिसतात. अलिकडील काळात विकासाचा झोत आला असला तरी समूहमनातील लोकसंस्कृतीचा ठेवा कायम आहे. माणदेशातील लोकसंस्कृती आणि लोकदैवतांचे वेगळेपण हे खास माणदेशीच आहे .

## निष्कर्ष :-

१. लोकदैवते ही कृर्षिनिष्ट व्यक्तिचा प्रभावशाली अविभाज्य भाग असून संबंधित व्यक्तीची समूहांतर्गत वर्तनप्रक्रिया त्या त्या लोकदैवतेच्या श्रध्देतून निर्माण झाली आहे.

२. लोकसंस्कृतीचा अभ्यास लोकमानस, लोकश्रध्दा, लोकविश्वास यावर केंद्रीभूत असल्याने त्यामधून मानवाची जीवन जगण्याची एक पध्दती निर्माण होते.

३. लोकदैवते ही लोकमानसाला भयमुक्त करतात आणि संरक्षण देतात.

४. लोक संस्कृतीच्या आचरणाचा मुख्य उद्देश हा वैचारिकतेपेक्षा भावनिक जास्त असल्याचे दिसते.

५. भारतासारख्या निसर्ग संपन्न व अगणित खेडयांमध्ये कित्येक वस्तुंना लोकदैवतांचे स्थान दिलेले असून त्यांचे प्रतिकात्मक मूर्तीकरण केलेले आहे.

६. लोक दैवतांवरील व लोकसंस्कृतीवरील श्रध्दा माणसाचे मनोबल तर उंचावतेच पण समूहाचा एकात्मता वाढवयास मदत होते.

७. आजच्या विज्ञानयुगात मानवाला समाधान प्राप्त करण्यासाठी आध्यात्मिक आणि सामाजिक मूल्यांची गरज आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

संदर्भ :-


१. विद्या व्यवहारे, लोकसाहित्य लोकसंस्कृती, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००२

२. शिंदे विश्वनाथ, लोकसाहित्य मीमांसा, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९८

३. व्यवहारे शरद, लोक वाङ्मय रूप-स्वरूप, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद १९९१

४. ढेरे, रां. चि, लोकदैवतांचे विश्व, पद्मगंधा प्रकाशन, २००७

५. डॉ. द. ता. भोसले, लोकजीवन व लोकसंस्कृती, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ २००५

६. डॉ. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरूप, सरिता प्रकाशन, औरंगाबाद, १९८९

७. मोरजे गंगाधर, लोकसाहित्य:बदलते संदर्भ, बदलती रूपे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे १९९७

८. डॉ. बाळासाहेब चव्हाण (संपा) लोकदैवत (स्मरणिका) ज. पा. भोसले, कॉलेज, कोरेगांव, २०१३


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.